# सायबर सुरक्षा जनजागृतीसाठी वॉरिअर क्लबची स्थापना

धुळे । श्री शि. वि. प्र. संस्थेच्या विज्ञान महाविद्यालयाच्या संगणक विभागाचा क्विक हिल फाउंडेशन सोबत सायबर सुरक्षा जनजागृती करण्यासाठी सामंजस्य करार झालेला आहे. या अंतर्गत सायबर वॉरियर क्लब ची स्थापना करून ३० विद्यार्थ्यांची सायबर वॉरियर तसेच क्लब ऑफिसर म्हणून निवड करण्यात आली. या क्लबचे उद्घाटन सीएमसीएस कॉलेज नासिक येथे पार पडले.

या कार्यक्रमाचे उद्घाटन क्विक हिल फाउंडेशनच्या अध्यक्षा श्रीमती अनुपमा काटकर यांच्या प्रमुख उपस्थित करण्यात आले. तसेच या सोहळ्यासाठी क्विक हिल फाउंडेशनचे सहयोगी व्यवस्थापक श्री अजय शिर्के तसेच सीएसआर एक्झिक्युटिव्ह श्रीमती सुगंधा दाणे व सीएमसीएस महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. शेलार उपस्थित होते. या प्रसंगी अजय शिर्के यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना सायबर जनजागृती बद्दल सखोल मार्गदर्शन केले. तसेच श्रीमती अनुपमा यांनी क्विक हिल कंपनीचे संस्थापक



कैलाश काटकर यांच्या जीवनपट विषयी सांगून विद्यार्थ्यांना प्रेरित केले. याप्रसंगी क्लब ऑफिसर व शिक्षक समन्वयक यांचा गौरव करण्यात आला. यामध्ये साक्षी देवरे- क्लब प्रेसिडेंट, अजय खैरनार -कम्युनिटी डायरेक्टर, प्रशांत भदाणे -क्लब सेक्रेटरी, श्रेया विसपुते- झठ मीडिया डायरेक्टर तसेच संगणक विभागाच्या प्रा डॉ. स्वाती बोरसे यांचा सत्कार करण्यात आला. निवड झालेले ३०विद्यार्थी हे प्रा. स्वाती बोरसे यांच्यासोबत धुळे जिल्ह्यातील विविध शाळा महाविद्यालयातील विद्यार्थी तसेच समाजातील विविध घटकांपर्यंत पोहोचून सायबर गुन्ह्यांविषयी जागृती करतील. हे गुन्हे टाळण्यासाठी काय काळजी घेतली पाहिजे याबद्दलही मार्गदर्शन करतील. तसेच सायबर गुन्हा झाल्यास त्वरित १९३० या नंबरवर संपर्क साधण्याची आवाहन करतील. तसेच वैयक्तिक व आर्थिक माहितीचे नुकसान होण्यापासून वाचवतील. निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन माननीय बाबासाहेब कुणाल पाटील, उपाध्यक्ष माननीय बापूसाहेब एस टी पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम व्ही पाटील, उपप्राचार्य के एम बोरसे, संगणक विभाग प्रमुख प्रा.डॉ.राकेश देवरे यांनी अभिनंदन केले आहे.